विशेष दिवाणी दावा क्र.०९/२०१७
गंगाधर वि. संभाजी
**वादीतर्फे सा.क्र.७ (नि.क्र.४५५)**

**<u>शपथेवर सत्य कथन करतो की,</u>**

**माझे नांव:-**विजयकुमार शिवशरणअप्पा चितकोटे , **वय:-** ६१ वर्षे,

**व्यवसाय:-** व्यापारी , **रा.**लातूर.

**<u>सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.व्ही.एस.शेळके यांच्यावतीने शपथेवर सुरु.</u>**

**०१.** मी लोखंडी साहित्याचा खरेदी व विक्रीदार आहे. माझ्या दुकानाचे नाव मे.जयप्रकाश शिवशरणअप्पा चितकोटे फर्म असे आहे. मागील ६० वर्षापासून वडिलांच्या काळापासून लातूर एस.टी.बस स्टॅण्डजवळ हे दुकान सुरु आहे. मी वादी क्र.१ यांना ओळखतो. ते माझे जूने ग्राहक आहेत. त्यांनी माझ्याकडून खुप जास्त प्रमाणात आगाऊ सूचना देवून साहित्य खरेदी केले. लोखंडी अॅगल्स, काटेरी वायर, चैनलींक जाळी, पत्रे इत्यादी साहित्य त्यांनी मोठया प्रमाणात माझ्याकडून खरेदी केले. दि.१५/०१/२००६ रोजीचे पत्र आता मला दाखवले. त्यावर माझी सही आहे. ते माझ्या दुकानाच्या लेटरहेडवर आहे. २००४ व २००५ साली त्यांनी सदर साहित्य खरेदी केले असल्याबद्दल त्या पत्रात उल्लेख आहे. पत्रातील मजकुर बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.४५६</u>** देण्यात येते. सदर साहित्य वादीच्या ७० एकर डाळींब बागेकरीता आवश्यक असल्याचा त्यात उल्लेख आहे. माझ्या दुकानात साधारण २००२ ते २००६ या काळात पंचवीस ते तीस लाख रुपयांची खरेदी झाली आहे. वादीने सदर माल उधारीवर घेतला आणि टप्प्या-टप्प्याने माझे पैसे फेडले.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री.पौळ यांच्यावतीने सुरु.</u>**

**०२.** हे खरे की, माझ्या दुकानाचा नोंद क्रमांक लेटरहेडवर लिहिलेला नाही. दुकानासाठी शॉप अॅक्ट, व्हॅट, जी.एस.टी. असे वेगवेगळे परवाने लागतात. आजरोजी मी सदर कागदपत्रे आणलेली नाहीत. मी आजरोजी वादीस विकलेल्या वस्तुंचे बील बुक आणलेले नाही. मला सदर माल मी त्यांना किती तारखेला विकला ते सांगता येणार नाही. मला बीलाची रक्कम, परतफेडीच्या तारखा सांगता

येणार नाहीत. हे खरे की, नि.क्र.४५६ मध्ये कोणत्याही बीलाचा उल्लेख नाही. मे.जयप्रकाश शिवशरणअप्पा चितकोटे फर्मचे मालक सौ.सुचिता विजयकुमार चितकोटे या आहेत. हे खरे की, नि.क्र.४५६ वर सौ.सुचिता यांची सही नाही. मी वादीच्या शेतावर कधीही गेलेलो नाही. वादीने माझ्याकडून घेतलेला माल त्यांनी कोठे व कशासाठी वापरला हे मला सांगता येणार नाही. मी त्यांच्या जमिनीचा ७/१२ उतारा पाहिलेला नाही. वादीने मला टप्प्या-टप्प्याने नगदी रक्कम दिली. हे खरे की, नि.क्र.४५६ मध्ये शेवटचे वाक्य वादीच्या सांगण्यावरुन लिहिले. नि.क्र.४५६ मध्ये नमूद रक्कम कोणत्या बीलापोटी दिली त्याचा क्रमांक त्यात नमूद नाही, हे म्हणणे खरे आहे. हे खरे की, त्यात करापोटी किती रक्कम कापण्यात आली, याचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दिलेले प्रमाणपत्र वादीच्या सांगण्यावरुन खोटे तयार करुन दिले. हे खरे नाही की, त्यात नमूद साहित्य मी वादीला कधीही विकलेले नाही. ७० एकर क्षेत्राला लागणारे साहित्य जे नि.क्र.४५६ मध्ये नमूद आहे, ते तेवढेच लागते असे मी खोटे सांगतो, हे म्हणणे खरे नाही. पत्र्यांचा उल्लेख नि.क्र.४५६ मध्ये नाही. कधी-कधी वादी स्वत: किंवा कधी त्यांचे मुनीम माल घ्यायला माझ्याकडे यायचे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.** **श्रवणोत्तर स्विकृत**

समक्ष

स्वाक्षरीत/-
**( एस.एन.सरडे )**

दिनांक:१०/०२/२०२६. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.